## नि.क्र. २२ वर आदेश

सदरचा अर्ज हा वादीने दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याच्या विनंतीने केलेला आहे. वादी व प्रतिवादी वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादीच्या कथनानुसार काही अपरिहार्य कारणामुळे नि.क्र. १५ वरील आदेशाप्रमाणे दुरुस्ती करण्याची राहून गेली. त्यामुळे ती परवागनी मिळावी.

३. प्रतिवादी यांनी हरकत घेवून कथन केले की अर्ज बेकायदेशीर असून आदेशात चौदा दिवसामध्ये दुरुस्ती करण्याचे स्पष्ट निर्देश असताना दिनांक १४.०५.२०१९ रोजी व तद्नंतर दुरुस्ती केलेली नाही व खर्चाची रक्कमही दिलेली नाही. अर्ज रद्द होण्याची विनंती प्रतिवादीने केली. वैकल्पिकरित्या रु. १,०००/— चा खर्च मिळणेची विनंती केली.

४. दावा हा निरंतर ताकिद व जाहीर होवून मिळणेकरीता आहे. दुरुस्तीही त्रयस्थ पक्षकार याकामी प्रतिवादी करण्याच्या विनंतीबाबत आहे. याकामी अर्ज मंजूर होवून चौदा दिवसापेक्षा जास्त कालावधी झालेला असलातरी दाव्याचे स्वरुप व पक्षकारांमध्ये अनेक दावे होवून क्लिष्टता वाढू नये व सर्व पक्षकारांच्या उपस्थितीत गुणागुणावर निकाल देणेकरीता अर्ज मंजूर करणे न्यायोचीत आहे. सदरकामी झालेल्या उशीराबाबत प्रतिवादी यांना खर्च देता येवू शकतो. सबब खालील आदेश:

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी नि.क्र. १५ वरील आदेशाप्रमाणे दुरुस्ती प्रतिवादी यांना रु. ३००/— अधिक खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(रा. सु. धडके)
दिनांक : ३१.०७.२०१९ २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
बार्शी, जि. सोलापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/Order.

(a) Name of the Stenographer : S. V. Kokate

(b) Court : R. S. Dhadake, 2nd Jt. C.J.J.D. & JMFC, Barshi.

(c) Judgment/Order signed by P.O. on : 31/07/2019.

(d) Judgment/Order uploaded on : 01/08/2019.